सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग




थेट दूरध्वनी क्र. :– +९१–२२–२२६२ १२२०
दूरध्वनी केंद्र क्र.:– +९१–२२–२२६२ ०११४
विस्तारित क्र. :– १३८ (पोलीस उप आयुक्त (प्रकटी.))
६२९ (वाचक अधिकारी),
१२१ (स्टेनो), ६२८ (लेखनिक)
ई.मेल :– cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

पोलीस उप–आयुक्त(प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
( नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर
डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई – ४०० ००१

क्रमांक पोउआ (प्रकटी)/जा.क्र. १४८०/२०२५ दिनांक १०/११/२०२५

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय, मुंबई.

विषय :– Best Detection of the Month Sept 2025 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month Sept 2025 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

**माहे सप्टेंबर –२०२५** करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात (उत्कृष्ट गुन्हे शोध) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात (उत्कृष्ट अपराधसिध्दी)**'' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ)**

➤ **माहे सप्टेंबर – २०२५ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

१) **मालवणी पोलीस ठाणे**, परिमंडळ ११, मुंबई गु.र.क्र. **११९९/२०२५**, कलम १०३(१), ६४(१) भा.न्या.स.

**ब)**

➤ **माहे सप्टेंबर – २०२५ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

१) **भायखळा पोलीस ठाणे**, परिमंडळ ०३, मुंबई गु.र.क्र. १४६/२०१८ कलमः–३०२, ३२४, ३२३, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ भादवि सह ३७ (१) (अ), १३५ म.पो.का.

२) **अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट**, मुंबई गु.र.क्र. ०१/२०२१, कलम ८(क) सह २१(क) एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ सह कलम– १४–अ (ब) परकिय नागरिक कायदा १९४६.

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ) **माहे सप्टेंबर – २०२५** बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

**प्रत**:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

मजकुर :—

दिनांक ०६/११/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ”** माहे **सप्टेंबर २०२५** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर २०२५ — ०१ गुन्हा

| ०१ | मलवणी पोलीस ठाणे परिमंडळ ११, मुंबई. | गु.र.क्र. ११९९/२५ कलम १०३(१), ६४(१) भा.न्या.स. |
|---|---|---|

**—: “ बलात्कार करून खून करणे ” :—**

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात महिला नामे राणी जितेंद्र शुक्ला हिचा कुणीतरी अज्ञात व्यक्तीने तिच्यावर बलात्कार करून तिचा गळा आवळुन जीव घेतला म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. दिपक जितेंद्र शुक्ला, वय ५० |
| बळीत | :— | राणी जितेंद्र शुक्ला वय अंदाजे ४५ |
| आरोपी अटक व दिनांक | :— | चंद्रपाल सिंग रामखिलाडी जादोन उर्फ नेता ठाकूर, वय ३४<br>**अटक दिनांक** — दि.२८/०९/२०२५. |

तपास कौशल्य :— नमूद गुन्ह्यात परिमंडळ ११ व १२ मधील गुन्हे प्रकटीकरण अधिकारी यांचे पथकांनी मालवणी परिसरातील सलग ०४ दिवस सीसीटीव्ही फुटेज तपासणी करून अथक परिश्रम घेवुन गुन्हयातील आरोपीताने वापरलेली रिक्षा नि पन्न केली. त्याआधारे आरोपी नामे चंद्रपाल रामखिलाडी उर्फ नेता, वय ३४ वर्ष, रा.ठी — कराउधना कलान, तहसील — किरौली, आग्रा, उत्तरप्रदेश यास नि पन्न केले. सदर आरोपी नामे चंद्रपाल रामखिलाडी उर्फ नेता याचेबाबत तांत्रिक तपास करून त्यास मथुरा, उत्तर प्रदेश येथुन ताब्यात घेवून त्याचेकडे सखोल व कौशल्यपुर्वक तपास केला असता त्याने नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले वरून त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. तद्नंतर मा. रिमांड मॅजिस्टेट, न्यायालय अपर सिव्हील जज, जी.डी — १०, मथुरा, उत्तर प्रदेश यांचे न्यायालयात ट्राझिस्ट रिमांड मिळणेकामी हजर केले असता मा. न्यायालयाने सदर अटक आरोपीतास दिनांक ३०/०९/२०२५ रोजीचे १६.०० वा. पर्यंत ट्रान्झीट रिमांड मंजुर केले आहे. आरोपीतास आज रोजी मा न्यायालयात रिमांडकामी हजर केले असता त्यास दिनांक ०६/१०/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली आहे. नमूद क्लिस्ट गुन्ह्याचा तपास तपासपथक यांनी अथक परीश्रम व योग्य त्या ताळमेळाचा सुयोग घडवुन पार पाडले व गुन्हयाची यशस्वी उकल करण्यात यश संपादन केलेले आहे.त्यामुळे जनमानसात पोलीसांची प्रतिमा उंचावली आहे.

## मालवणी पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | जीवन धोंडुजी भातकुले | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहा. पोलीस निरीक्षक | प्रथमेश प्रकाश विचारे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | राजेश रवींद्र कदम | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र.०४.०१८५ | रूपेश एकनाथ कांबळी | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र.१३.०१६८ | गणेश गिरजप्पा शिंदे | प्रशस्तीपत्रक |

............................

मजकुर :–

दिनांक ०६/११/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या **"BEST CONVICTION OF THE MONTH"** माहे सप्टेंबर २०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर २०२५ – ०२ गुन्हे

| | | |
|---|---|---|
| ०१ | भायखळा पोलीस ठाणे, परिमंडळ–३, मुंबई. | गुरक्र व कलमः– १४६/२०१८ कलम ३०२, ३२४, ३२३,१४३, १४४, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ भादवि सह ३७(१)(अ), १३५ म.पो.का. |

–: "खून करणे ":–

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :– यातील नमुद तारीख,वेळ व ठिकाणी नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन घातक शस्त्रानिशी फिर्यादी व त्यांच्या साथिदारावर आरोपींच्या रॅश ड्रायव्हिंगला अटकाव केल्याचे कारणावरून वाद घालून फिर्यादीस व त्यांच्या साथिदारास पटटयाने, हाताने, पायाने मारहान केली. त्यापैकी फिर्यादीचा मित्र भावेश कोळी वय.२३ वर्ष यांचेवर प्राणघातक हल्ला करून डाव्या बाजुस छातीजवळ शस्त्राने भोसकुन त्याचे मरणास कारणीभुत झाले तसेच सदर वेळी फिर्यादीस व साक्षीदारांना धमकावले गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री. प्रतिक अवधुत पडवळ, वय २६ |
| निकाल दिनांक | :– | दि. १७/०९/२०२५ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :– | १) अनस अफसर सैयद २१ वर्षे.<br>२) मोहम्मद शहजाद मो.उमर शेख,१९ वर्षे<br>३) झिशान अफसर सैयद, २० वर्षे.<br>४) तलाह सादीक बरमारे, १९ वर्षे.<br>५) अबुसाहीब अबु हरेरा चौधरी, २० वर्षे. (मयत)<br>**अटक दिनांकः– ०३/०७/२०१८** |
| दोषसिध्दीचा तपशील | :– | नमुद गुन्हयात श्री. सत्यनारायण नावंदेर, मा. अति. सत्र न्यायालय, कोर्ट क्र.५४, मुंबई यांनी आरोपी क्र. ०१ यास दि. १७/०९/२०२५ रोजी जन्पठेप व २५,०००/– दंडाची सजा तसेच ०६ महिने साधी कैद व ५०००/– दंड सजा सुनावली. रू २५,०००/– दंड न भरल्यास एक वर्षाची साधी कैद व ५०००/– रु . दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधी कैदेची शिक्षा सुनावली आहे. |

तपास कौशल्य :– गुन्हयाचे गांभीर्य ओळखून जास्तीत जास्त साक्षीदारांचे जबाब नोंद करून आरोपीताविरूध्द दोषसिध्दी पत्र सादर केले. तसेच न्यायालयीन प्रक्रिया चालु असतांना सुनावणीच्या वेळी गुन्हयातील सर्व साक्षीदार कोर्टसमोर हजर कले. साक्षीदार व पंच यांना व्यवस्थित ब्रिफिंग करून मुददेमाल विहित वेळेत मा.न्यायालयास साद केले. तसेच सरकारी अभियोक्ता यांना गुन्हया संदर्भात पुरावे व माहीती देण्यास मदत केली.तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

### भायखळा पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | जितेश चंद्रशेखर शिंगटे | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहा. पोलीस निरीक्षक | जयदीप मोहन जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ह.क्र.३४१४४ | दिनकर त्रिंबक थोरात | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र.०९२२५२ | विनायक चंद्रकात कोळी | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र.१४१५२९ | किशोर बबन रामाणे | प्रशस्तीपत्रक |

..............................

| | | |
|---|---|---|
| ०२ | अ.प.वि.कक्ष, बांद्रा युनिट, मुंबई. | गुरक्र व कलम:– ०१/२०२१, कलम ८(क) सह २१(क) एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ सह कलम– १४–अ (ब) परकिय नागरिक कायदा– १९४६. |

**–: ''अंमली पदार्थाचे व्यसन लावुन विक्री करणे'' :–**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– नमुद गुन्हयांत हद्द्तीतील अंमली पदार्थ विक्रेते यांचा शोध घेवुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत वरिष्ठांनी आदेश दिल्याने वाकोला, सांताक्रुझ येथे आयव्हरी देशाचा नागरीक असलेला आरोपी हा टाटा नॅनो कारसह संशयास्पद रित्या मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन एकुण २०४ ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ व एक टाटा नॅनो कार जप्त गुन्हा नोंद करुन त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :– | सचिन गुलाब राठोड/ पो.शि.क्र. ०८१०५६ |
| **निकाल दिनांक** | :– | दि. ३०/०९/२०२५ |
| **अटक आरोपी व अटक दिनांक** | :– | होनोरे इग्वे गाही, (Honore Igwe Gahie), वय ४४<br>**अटक दिनांक**:– ०१/०१/२०२१ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :– | नमुद गुन्हयात मा. श्री सुनिल मा पाटील. एन.डी.पी.एस. विशे ा सत्र न्यायाधीश, ४२ वे न्यायालय, मुंबइ यांनी दि.३०/०९/२०२५ रोजी आरोपीस १२ वर्ष सक्त मजुरीची व १,२५,०००/– रू. दंडाची शिक्षा व दंड न भल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यांत आली. परकीय नागरीक अधि नियमाच्या कलम १४(अ)(ब) अन्वये गुन्हयाकरीता ०३ वर्ष सक्त मजुरीची व १२,५००/– रू. दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे वर नमुद दोन्ही शिक्षा आरोपीताने एकत्रित भोगा वयाच्या आहेत. |

**तपास कौशल्य** :– प्रत्यक्षदर्शी नमुद गुन्हयात एकूण ९ साक्षीदारांचे मा. न्यायालयासमोर सुनावणी दरम्यान जबाब नोंद करण्यात आले. प्रथम तपासी अधिकारी पो.उ.नि बागम व व्दितीय तपासी अधिकारी सपोनि सुरेश भोये यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. एका पंच साक्षीदाराचा जबाब मा. न्यायालयासमोर नोंद करण्यात आला. अटक आरोपी हा कोकेन या अंमली पदार्थासह एका नॅनो कारमध्ये मिळुन आल्याने सदरची कार पंचनाम्याअंतर्गत जप्त करण्यांत आली. त्याचा अभिलेख मा.न्यायालयासमक्ष सादर करण्यात आला.

रासायनिक विश्लेषक यांचा जबाब नोंद करण्यात आला आहे. जप्त मुद्देमालाचा रासायनिक विश्लेषण अहवाल मा. न्यायालयात सादर करण्यांत आला. तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीस दोषसिध्दी प्राप्त करण्याकरीता उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

## अ.प.वि.कक्ष, बांद्रा युनिट, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री. सुरेश विठ्ठलराव भोये | प्रशस्तीपत्रक |
| २ | स.फौ.क्र. ३२९४२ | श्री. सिध्देश्वर महादेव पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ह.क्र. ०७०९८३ | श्री. संदेश पांडुरंग मोहिते | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र. ०८१०५६ | श्री. सचिन गुलाब राठोड | प्रशस्तीपत्रक |
| ५ | म.पो.शि.क्र. ०९०११५३ | सौ. दिप्ती दिलीप देरेकर | प्रशस्तीपत्रक |

.............................

टिप:— वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, अॅन्टॉप हिल पोलीस ठाणे यांना Best Detection of the Month **Sept 2025** तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, मुंबई यांना कळविण्यात येते की Best Conviction of the Month **Sept 2025** या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of the Month) व सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी (Best Conviction of the Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) F.I.R प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब, शवविच्छेदन अहवाल, ओळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)** पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आलली आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs ……………………………….., Designation- …………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2025 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2025